

विनीता देशपांडे

# रंगीला रे

## रंगीला रे...

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल व ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रंगीला रे...

**विनीता श्रीकांत देशपांडे**

ई साहित्य प्रतिष्ठान

# रंगीला रे...

## लेखिका : विनीता श्रीकांत देशपांडे

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : १५ ऑक्टोबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



विनीता श्रीकांत देशपांडे

एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरुन काव्यवाचन प्रसारित, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन. "स्मृत्पर्ण" ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर आजही वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवि आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. या वर्षीच त्यांची फुल्लारी ही कादंबरीही प्रकाशित झाली आहे.

आगामी साहित्य- "अभ्यंतर" कादंबरी "भवताल" कथासंग्रह "पारुषण" गुढकथासंग्रह, आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स.१९००च्या पुढचा काव्यप्रवास)

होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक


अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम


10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर.


संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com




- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/fullari_vinita_deshpande.pdf

अर्पण पत्रिका

अविद्यागुणे मानवा उमजेना।

भ्रमे चुकलें हीत तें आकळेना॥

परीक्षेवीणें बांधले दृढ नाणें।

परी सत्य मिथ्या असे कोण जाणें॥१४३॥

(मनाचे श्लोक)

समस्त समुपदेशकांना समर्पित......

आयुष्य आपलंच असलं तरी ते आपल्या मनाजोगं असतंच असं नाही ना. जगण्याच्या शर्यतीत प्रत्येकाला तडजोड करावी लागते. कोणाला जगण्यासाठी आधार हवा असतो, कोणाला प्रेम, कोणाला निखळ मैत्री...प्रत्येकाच्या जगण्याच्या संकल्पना वेगवेगळया असतात. व्यक्ती तितक्या प्रकृती.. अरुंधतीचं आयुष्य असंच आहे. तिच्या आयुष्यात वेगवेगळे रंग भरणारा एक रंगीला हवा होता.. पण? काय? वाचा एक विलक्षण प्रेमकथा, **रंगीला रे**.

# रंगीला रे...

## १

नेहमीप्रमाणे घरातले कामं आटपून अरुंधती तयार झाली. परत एकदा आरशात स्वत:ला न्याहळून बघितलं. तिची नजर घड्याळ्याकडे गेली. नऊचा टोला पडला. शू रॅकवरची किल्ली घेत चपला अडकवत दार ओढलं, लॅच लावलं आणि लिफ्टचं बटण दाबलं. किल्ली पर्समध्ये टाकली.

"रंगिला रे...तेरे रंग में ... क्यूं रंगा है मेरा मन..." गुणगुणत ती लिफ्टची वाट बघत होती.

लिफ्ट खाली पोहचेपर्यंत तिला धीर नव्हता. केव्हा एकदा रंगीलाला भेटते असं झालं होतं. सोसायटीच्या ओळखीच्या लोकांशी संवाद टाळण्यासाठी घाईत असल्याचा आव आणत ती सोसायटीच्या आवाराच्या बाहेर आली. फाटकाबाहेर रंगीला तिची वाट बघत होता.

"बोल. आज काय झक्कास दिसतेस तू....तसा तुला कुठलाही रंग उठून दिसतो. मोरपंखी रंगात अगदी मत्तमयुरी दिसतेस.." रंगीला डोळा मारत म्हणाला

"तू पण ना... "जराशी लाजत अरुंधती त्याला म्हणाली

"ही तिच साडी आहे न....हम्म...काय...तिच ती न..." रंगीलाने डोळे मिचकावत विचारलं

"हो रे. तिच साडी आहे. आपल्या पहिल्या भेटीतली." अरुंधती डोळे मिचकावत म्हणाली

"मग, आज काय म्हणाले नवरोबा?" रंगीला

"तो नीरस प्राणी काय म्हणणार? सारखा आपला हिशोब आणि पैसा." अरुंधती लटक्या रागात म्हणाली.

"चल, सोड त्याला. आपण आपल्याबद्दल बोलू." रंगीला

"यस्स. आपल्याबद्दल बोलू." अरुंधती

"एक सांगू..." अडखळत अरुंधती म्हणाली

"एक काय...पाच सहा..शंभर सांग...मी भेटायला येतोच तुझं ऐकायला...बोल" रंगीला

"अरे, काल मी दुकानातून बाहेर पडले तर लोकं मला सारखे वळून बघत होते." अरुंधती

"खूप सुंदर दिसतेस न म्हणून.....काय वय असेल ग तुझं?" रंगीला

"तू विषय़ांतर करतोय..." अरुंधती

"नो. नॉट अट ऑल. डियर अरु....मी तुला काही विचारलं आहे.." रंगीला

"खरं सांगू?" अरुंधती खट्याळ हसत म्हणाली

"यप्प." रंगीला तिच्या कमरेभोवती हात गुंडाळत म्हणाला

"बेचाळीस" अरुंधती कुजबुजली

"व्हॉट? आर यू सिरियस?" रंगीलाने आश्चर्यानं विचारलं

"यस्स. फॉर्टीटू." अरुंधती

"कुठल्याच अॅन्गलने वाटत नाही. सिरियसली. तू स्वत:ला खूप छान मेन्टेन केलं आहे. नाही तर तुझा नवरा बघ...बोकोबा झालाय." रंगीला

"सारखं त्या नवऱ्याला मधे आणलच पाहिजे का रे?" अरुंधती चिडून म्हणाली

"सॉरी...वेरी सॉरी..." रंगीला कान पकडत म्हणाला

"आपल्या दोघात त्याला मधेमधे आणू नकोस रे. प्लीज." अरुंधती

"या पुढे नाही आणणार. आय प्रॉमिस. पण तू चिडू नकोस" रंगीला

"ओके. बस आली. बसमध्ये तू मागे बस. मी उतरली की तू पण उतर. बसस्टॉप माहिती न." अरुंधती

"रोजचाच न....माहिती मला. डोन्ट वरी." रंगीला

"खूप गर्दी होती न बसमध्ये." अरुंधती स्टॉपवर उतरत म्हणाली

"नवीन काय? रोजच असते." रंगीला

"तू माझ्यासाठी रोज त्या गर्दीत प्रवास करतो न....थॅंक्स." अरुंधती

"थॅंक्स कशाला? आय एक्सिस्ट इन दिस वर्ल्ड ओन्ली फॉर यू डियर अरु. सो चिल. डोन्ट वरी अबाउट मी." रंगीला

"तू काही तरी सांगणार होती न मला?" रंगीला

"मी? कोणाबद्दल?" अरुंधती

"हो, त्या प्राचीबद्दल...तुझी पेशंट प्राची मानकर." रंगीला

"अरे, मी विसरलेच. बघ हॉस्पिटल आलं बोलता बोलता. संध्याकाळी भेटू तेव्हा सांगते." अरुंधती

"संध्याकाळी भेटू...."रंगीला फ्लाईंग कीस देत म्हणला

सवयी प्रमाणे रंगीला रस्ता ओलांडून जाईपर्यन्त ती त्याच्याकडे एकटक बघत राहिली.

"काय? कुठे बघतेस? डॉ.शुभदा आल्यात. चल लवकर." डॉ.श्रद्धा हॉस्पिटलच्या गेटवर उभ्या अरुंधतीला म्हणाली

"कुठे काय? काही नाही ग. चल." अरुंधती खांद्यावरची पर्स नीट करत म्हणाली

"गुड मॉर्निंग अरुंधती. हिअर इज युअर टुडेस पेशंट लीस्ट." सीस्टर श्वेता तिच्या हातात केसचे डिटेल्स देत म्हणाली

"प्राची कशी आहे सीस्टर?" अरुंधतीने केस पेपर चाळत विचारलं

"तुमची वाट बघतेय." सीस्टर श्वेता

"गुडमॉर्निंग अरुंधती. यु आर लुकींग ग्रेट टुडे. ॲनीथिंग स्पेशल?" डॉ. शुभदाने हॉस्पिटलमध्ये येताच तिला विचारलं

"नथिंग मॅम." अरुंधती

"ॲनी वे कॅन आय आस्क यू समथिंग?" डॉ. शुभदा

"यस, अफकोर्स डॉक्टर." अरुंधती

"मी तुला गेटवर कोणाशी तरी बोलतांना बघितलं? कोणाशी बोलत होती?" डॉ.शुभदा

"जस्ट माय फ्रेंड.. डॉक्टर" अरुंधतीला विचारलेलं अजिबात आवडलं नव्हतं

"नाव काय? फ्रेण्डचं?" डॉ. शुभदा

"यस मॅम..." अरुंधतीला तिच्या या प्रश्नाचं उत्तर द्यायचं नव्हतं

"आय नो इट्स परसनल. आय वील नॉट इन्सीस्ट यू." म्हणत डॉ.शुभदा केबीनकडे वळल्या.

जातांना त्यांनी परत तिच्याकडे वळून बघितलं. ते अरुंधतीला लक्षात आलं.

दिवसभर पेशंट आणि काम...आज तिनं लंचसुद्धा घाईघाईत केला. साडेपाच झाले तसं तिनं आवरलं. नोटस सीस्टरला देत ती निघाली.

"अरुंधती...थांबतेस का? मी ही निघतेच आहे पाच मिनटात. बसस्टॉपपर्यन्त गप्पा मारत जाऊ. या कामाच्या व्यापात इतक्यात आपलं बोलणं होत नाही ग." ॲडमिन हेड रिमाने विचारलं

"मी खूप घाईत आहे ग." म्हणत अरुंधती निघालीसुद्धा

"श्वेता, आजकाल ही विचित्र वागते न ग. आपल्यासोबत बोलायचं टाळते." रिमा

"हो ग. आज शुभदा मॅडमच्या प्रश्नांची उत्तरं दिली नाही तिनं" श्वेता

"सोड...जाऊ दे. मनस्वी आहे ती थोडी." रिमा

"कसली घाई असते हिला. ना मुल ना बाळ. सुटसुटीत संसार. नवरा मुठीत असतो. रोज तरी साडेपाचच्या टोल्याला निघते." श्वेता

"सोड ना! तिचे पेंटिग्सचे प्रदर्शन वैगरे असेल म्हणून घाईत गेली असेल." रिमा

"माहिती मला तिचा तो छंद. पण तू काहीही म्हण इतक्यात सर्वांशी तुटक वागते ग ती." श्वेता

"हे एकदम बरोबर बोललीस श्वेता." डॉ.श्रद्धा

"ती तशीच आहे. कामाशी काम ठेवणारी. आपल्यासारखं रेंगाळणाऱ्या गप्पा नाही आवडत तिला." रिमा

"हो तुझी खास मैत्रीण ना ती. तुला पुळका असणारच." श्वेता चिडून म्हणाली

"तिच्यासारखं अप टू डेट आणि परफेक्ट काम करा आधी. मग बोला" रिमाने चिडून उत्तर दिले

ती जरी ज्युनिअर डॉक्टर श्रद्धा आणि रिसेप्शनिस्ट श्वेतावर चिडली असली तरी खरच अरुंधती बदलली होती हे ही खरच होतं. वेळ मिळाल्यावर बोलू तिच्याशी या विचारात रिमा दवाखान्यातून निघाली.

--------००००००--------

"आज चक्क पाच मिनटं उशीर झाला तुला." रंगीला रागात म्हणाला

"हो न. अगदी निघतांना रिमा म्हणाली सोबत जाऊ म्हणून.." अरुंधती खांद्यावरची पर्स सावरत म्हणाली

"ओके..." रंगीला

"चिडलास?" अरुंधती

"नाही ग. मी कशाला चिडू? बोल. खूप थकलेली दिसतेय" रंगीला

"हो रे. आज खूप काम होतं. सगळ्या फाईल्स अपडेट करायच्या होत्या." अरुंधती

"खूप थकल्यावर तुला काय करायला आवडतं? आय मीन रिफ्रेश व्हायला ग." रंगीला

"मस्त शॉवर घ्यायचा...एक वाफाळलेली किंचित स्ट्रॉंग किंचित गोड कॉफीचा कप घेऊन टेरेस गार्डनमध्ये बसायचं. मंद स्वरात इंस्ट्रुमेंटल म्युझिक डोळे मिटून ऐकायचं...." अरुंधती

"वीच इंस्ट्रुमेंटल म्युझिक?" रंगीला

"वॉयलिन...फ्लुट.. जोगांचं गाणारं वॉयलिन माझ्या सगळयात आवडतं आहे." कौतुकानं सांगतांना तिला लक्षात आलं आपण कित्येक दिवसात संगीत ऐकलं नाहीया.

"ग्रेट चॉइस..." रंगीला

"थॅंक्स. तू मला आठवण करुन दिल्याबद्दल." अरुंधती त्याचा हात हातात घेत म्हणाली

"आज बसस्टॉप खूप लवकर आला न." रंगीला

"हो रे. तुझ्यासोबत गप्पाकरत दवाखाना ते बसस्टॉपवर कधी पोहचतो कळतच नाही." अरुंधती

"बस आली बघ." रंगीला

"आजपण गर्दी आहे खूप. उतरल्यावर भेटू रे" अरुंधती कानात इअरप्लग टाकत म्हणाली

"कंडक्टरशी कशाला भांडत होती?" रंगीला

"तो सारखा वळून बघत होता माझ्याकडे. मी त्याला तिकीट दाखवलं...घेतलं आहे मी...तेव्हा वळून बघायचा थांबला तो" अरुंधती

"आता काय प्रोग्राम?" रंगीला

"मघाशी सांगितला न...शॉवर...कॉफी..टेरेस.... प्रभाकर जोगचं गाणारं वॉयलिन आणि मी." अरुंधती

"चल मग..." रंगीला

"अरे पण तू माझ्या घरी कधी येत नाहीस न....तूच म्हणतो न.....तुझा गडी..तुझं राज्य." अरुंधती अडखळत म्हणाली

"तुला नको असेल तर नाही येत मी...." रंगीला खालच्या आवाजात म्हणाला

"तसं नाही रे. समजा अखिलेश तेवढ्यात आला तर..." अरुंधती

"फोन करुन विचार त्याला." रंगीला

"रंगीला...नाही म्हणजे नाही....." अरुंधती चिडून म्हणाली

"तुला पेंटिंग करतांना बघायचं आहे ग एकदा. तुझ्या या लांबसडक बोटांतून कॅनवासवर रंग उतरतांना बघायचे आहे." रंगीला तिच्या हातावरुन हात फिरवत म्हणाला

"कसं शक्य आहे?" अरुंधती

"तुझ्या डोळयात... मनात... देहात असलेला आकार त्या कॅनवॉसवर साकारतांना बघायचं आहे एकदा... फक्त एकदा." रंगीला

"शक्य नाही हे, तुला कळतंय रंगीला." अरुंधतीचा आवाज चढला होता

"तुला टेरेसवर डोळे बंद करुन संगीत ऐकतांना डोळे भरुन बघायचं आहे." रंगीला

"नाही...नाही...शक्य नाही ते. ठाऊक आहे तुला. तरी का आग्रह करतोय?" अरुंधतीचा आवाज चढला होता

"खर सांग. तुला हवंय हे सगळं...मग का टाळतेस?" रंगीला

"हवंय ना....पण....थांब...विचार करु दे. आता जा तू. प्लीज जा." अरुंधती चिडून म्हणाली

"ओके..ओके...आय गॉट इट." रंगीला बिल्डींगच्या बाहेर थांबत म्हणाला

"बाय...उद्या भेटू." अरुंधती

त्याच्या चेहऱ्यावर तिला राग स्पष्ट दिसत होता. त्याला अपसेट करायचं नव्हतं. पण समजा अखिलेशला कळलं तर. कळलं तरी काय हरकत आहे म्हणा. माझं विश्वं....माझा रंगीला....फार फार तर काय? निघून जाऊ त्याच्यासोबत.....हा विचार येताच ती खजील झाली. स्वत:च्या विचारातील ही बंडखोरी तिला आवडली नव्हती. या विचारात तिनं दार उघडलं. धाडकन जाऊन सोफ्यावर बसली. रंगीला घरात आला तर? हा विचार करत बराच वेळ ती कोचवर पडून होती. फोनच्या रिंगने ती भानावर आली.

"हॅलो, अरु" अखिलेश

"बोल रे" अरुंधती

"माझा डीनर बाहेर आहे आज. मी, संजू, शैलेश आणि नंदू आम्ही अलुमनी पार्टीबद्दल डिसकशन करायल भेटतो आहे. सो प्लीज. तू स्वीगीवरुन काहीतरी ऑर्डर करुन घे न. सॉरी यार. .. " अखिलेश

"ओके. नो प्रॉब्लेम" अरुंधती

आता तर माझा गडीपण उशीरा येणार होता. रंगीला आला असता तर? मीच नाही म्हंटलं त्याला. तो नाराज झाला" अरुंधती विचार करत होती.

आय एक्सिस्ट इन दिस वर्ल्ड ओन्ली फॉर यू डियर अरु. तिला आठवलं आणि स्वत:शीच हसली. दिड दोन वर्ष झाले असतील त्याला भेटून. एक मात्र खरं की तिच्या आयुष्यात रंगीला आल्यापासून ती खूप खुश होती.

रंगीला रे...तेरे रंग मे...क्युं रंगा है..मेरा मन.....रंगीलाची आठवण येताच तिचा मूड फ्रेश झाला...मग काय एक शॉवर घेतला. कॉफीचा कप घेऊन टेरेसवर आली आणि वॉयलीनच्या मंद सूरात हरवून गेली.

## २

वॉयलीनच्या मंद सुरात रात्री केव्हातरी अरुंधतीचा डोळा लागला. आल्यावर अखिने तिला उठवलं नाही.

"अरु, गुड मॉर्निंग." अखिलेश

"गुडमॉर्निंग" अरुंधती

"आज काय दवाखान्याला दांडी का?" अखिलेश

"का रे?" अरुंधती आळस देत म्हणाली

"किती वाजलेत बघ?" अखिलेश

"बाप रे! साडे आठ! रात्री किती वाजता आलास?" अरुंधती

"एक च्या आसपास आलो." अखिलेश

"मला उठवायचं नाही का?" अरुंधती चिडून म्हणाली

"इट्स ओके. चिल. तू आवर पटकन. मी सोडतो आज तुला." अखिलेश

"नको..नको...मी जाईन... माझी. " अरुंधती ब्रश करता करता म्हणाली

"अग मी सोडतो तुला आज" अखिलेशला तिच्या नाही म्हणण्याचं कारण कळत नव्हतं.

"रंगीला चिडेल उगीचच." अरुंधती चुळ भरतांना बोलून गेली

"काय?" अखिलेश वैतागून म्हणाला

"अरे, काही नाही....रंगीला रे गाणं म्हणत होते मी." अरुंधती

"तू निघ. माझ्यामुळे तुला उशिर नको. लॅच ओढून घे रे." अरुंधती बाथरुमच दार बंद करत म्हणाली

अरे बाप रे! आज अखिलेशला कळलं असतं तर? तयार होतांना तिच्या मनात विचार आला. कधी न कधी तर कळणार ना. तेव्हा मग? तेव्हाचं तेव्हा बघू. डॉ.शुभदा आणि श्वेताला उशिरा पोहचण्याचा मॅसेज करुन ती पटकन तयार झाली. तिला रंगीलाची नाराजी नको होती.

नेहमीसारखं शू रॅकवरुन किल्ली घेत चपला अडकवल्या लॅच लावून लिफ्टचं बटन दाबत किल्ली पर्समधे टाकतांना ती गुणगुणायला लागली...रंगीला रे...तेरे रंग में...क्युं रंगा है....मेरा मन....

गेटच्या बाहेर रंगीला तिची वाट बघत होता.

तिच्याकडे बघून तो नेहमीसारखा मिस्किल हसला नाही. आज त्यानं तिचं कौतुक केलं नाही...राग येणं सहाजिकच होतं म्हणा.

"सॉरी रे. आज काय माहिती कशी काय उशिरा उठले....सॉरी" तिचे डोळे पाणावले

"अग रडायला काय झालं?" रंगीला

"तू रडतांना किती गोड दिसतेस.. आणि ही तुझी बट..." रंगीला डोळ्यावर आलेली बट हलकेच बाजूला करत म्हणाला

"तू पण ना...." अरुंधती डोळे पुसत म्हणाली

"चल आज फिरुन येऊ...मस्त बाहेर जेवू...हाफ डे घे आज." रंगीला

"माझ्या मनातलं बोललास." अरुंधती

"आय एक्झिस्ट इन दिस वर्ल्ड ओन्ली फॉर यू डियर...सो तुझ्या मनात काय चाललं ते तर मलाच ठाऊक नं" रंगीला डोळे मिचकवत म्हणाला

"चल...मग तळ्यातल्या गणपतीला जाऊ......नंतर पाव भाजी खाऊ. खूप दिवसात खाल्ली नाही मी..तिथून मी ऑफिसला जाते" अरुंधती

"ॲज यू विश मॅम... कॅब की रिक्षा ?" रंगीला

"रिक्षा." कानात इअरप्लग टाकत अरुंधती म्हणाली

"काय ऐकत असते ग सदा न कदा?" रंगीला

"काही नाही रे...कानात असलं म्हणजे..आजुबाजुच्या कर्कश्श आवाजाचा त्रास नाही होत." अरुंधती

"सारसबाग" अरुंधतीने रिक्षावाल्याला सांगितलं

गणपतीचं दर्शन घेऊन ते बराच वेळ बागेत बसले. तिचे चित्र, तिचे पेंटिंगचे विषय, तिला अजून कोणते काढायचे आहेत. येत्या दिवाळीत जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये प्रदर्शनात तिला तिच्या पेंटिंग्स प्रदर्शित करायच्या होत्या. खूप गप्पा केल्या. हातात हात घालून फिरले. पावभाजी खाऊन ज्यूस प्यायले आणि निघायची वेळ झाली. रंगीलाला सोडून जातांना तिला वाईट वाटत होतं.

"अरे यार, मन नाही भरलं. तुझ्याशी किती गप्पा करायच्या आहेत मला." अरुंधती

"मी कुठे काय म्हणालो? तूच निघालीस." रंगीला

"तू हाफ डे घे म्हणाला म्हणून मी...."अरुंधती

"तू मनात फुल डे सुट्टी आणलं असतं तर मी तेच सांगितलं असतं ना." रंगीला

"काय? डोन्ट प्ले वीद मी रंगीला." अरुंधती चिडून म्हणाली

"खरं सांगतोय मी....मी जे तुझ्या मनात असणार तेच बोलणार ना." रंगीला

"राहू दे...चल आता" अरुंधती

"ओके. चल." रंगीला

"दवाखान्यात जायचा अजिबात मुड नाहीया." अरुंधती

"मग नको जाऊ" रंगीला

"रिक्षा, कोथरुड बसस्टॉप" अरुंधती रिक्षात बसत म्हणाली

बसस्टॉपवरुन घरी पायी निघाली. चालता चालता तिने "तब्येत ठिक नसल्याने येत नाही" असा मॅसेज श्वेताला केला. जातांना दोघंही शांत होते.

"उद्या भेटू." रंगीलाचा हात सोडत अरुंधती म्हणाली

"ओके" रंगीला

"आज हट्ट नाही करणार वर यायचा?" अरुंधती

"तुझ्या मनात नाहीया मग कसा येणार मी?" रंगीला

"हो. ते ही खरंच रे. अधेमधे विचारांच बंड उसळत ना. तेव्हा वाटतं, आपल्याबद्दल कळलं तर कळलं. पण धीर होत नाही रे." अरुंधती

"व्ही विल फ़ेस दिस टूगेदर. डोन्ट वरी." रंगीला हातात हात घेत म्हणाला

"आय ट्रस्ट यू." अरुंधती

"आय ट्रस्ट यू." रंगीला

अरुंधतीचा राग निवळला होता. "रंगीला रे.." गाणं गुणगुणत तिने लिफ्टचं बटन दाबलं. तसा वॉचमन म्हणाला.

"काय मॅडम, आज बरं नाही वाटतं? लवकर आलात."  वॉचमन

उत्तर न देताच अरुंधती लिफ्टमध्ये चढली. घरी येऊन कोचवर डोळे मिटून पडून राहिली. रंगीलाचा राग ओसरला असला तरी त्याचं वागणं तिला अजिबात आवडलं नव्हतं. त्याचं चुकलं नव्हतच...जे माझ्या मनात तेच तो करतो न....मग मला त्याचा राग का आला? तिला कळत नव्हतं. त्या क्षणी तिला गाणं, कॉफी, काहीच नको होतं.... ती तशीच खूप वेळ शांत पडून राहिली....

संध्याकाळी बेलच्या आवाजानं ती उठली.

"हाय. कशी आहेस?" अखिलेशने तिचा अवतार बघत दरवाज्यातच विचारलं.

"आता ठीक आहे." अरुंधती

"कॉफी घेणार का?" अखिलेश

"हम्म. चालेल." अरुंधती पाणी पिता पिता म्हणाली

"एक विचारु?" अखिलेश

"बोल ना?" अरुंधती

"आज तू ऑफिसला दांडी मारुन कुठे गेली होती?" अखिलेश

"का रे? अरुंधतीन घाबरत विचारलं.

अखिलेशने तिच्याकडे रोखून बघताच ती भितीने शहारली. त्याला कळलं असेल का या विचारात ती हरवली. भयाण शांततेचा भंग करत त्याने परत विचारलं "माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलं."

"तळयातल्या गणपतीला." अरुंधती

"का?' अखिलेश

"असच" अरुंधती

"अरु, मी गेले काही महिने बघतो आहे, तुला नक्की काय होत आहे? सांगशिल का?" अखिलेश

"काही नाही. आय ॲम आलराइट." अरुंधती आश्चर्याने म्हणाली. हा असं का विचारतोय तिला कळेना.

"आपण उद्या डॉ.शुभदाशी बोलू." अखिलेश

"काही गरज नाही रे. वैताग आला होता मला त्याच त्याच रुटीनचा म्हणून आज दांडी मारली." अरुंधती त्याला समजवत म्हणाली

"आर यु शुअर?" अखिलेश

"यस्स." अरुंधतीच्या आवाजातील रोष वाढला होता

ऑफिसमधून फोन आला तसा अखिलेश टेरेसवर गेला. तो बराच वेळ बोलत होता. ती पाठमोरी त्याला कितीतरी वेळ बघत होती. अखिलेशशिवाय आपण कसं जगणार? अखि आणि रंगीला दोन्हीत आपला जीव अडकलेला. एकाला सोडणं गरजेचं आहे का? दोघांसोबत रहाता येणार नाही का? अरे बाप रे! आपण काय विचार करतोय ती दचकून भानावर आली. आपण रंगीलाला सतत सांगत असतो.....अखिलेश तेवढा वाईट नाही. आपण का चिडतो त्याच्यावर? का त्याचा राग राग करतो? तिला कळत नव्हतं....समजत नव्हतं......उमगत नव्हतं.

# ३

अखिलेश तेवढा वाईट नाही. मग आपण सतत अखिवर का चिडतो? का त्याचा राग राग करतो? तिला कळत नव्हतं....समजत नव्हतं......उमगत नव्हतं. तो कितीही चांगला असला तरी तो कधी तिच्या मनाप्रमाणे वागत नव्हता का? असं ही नाही. मग काय बोच होती दोघांमध्ये? किती स्पेस देऊ केली होती त्याने अरुंधतीला, कुठल्याही डिसीजनमध्ये तो काही बोलायचा नाही. अरुला सतत वाटायचं की त्याने तिचं कौतुक करावं. पण छे! अखिचा तसा स्वभाव नव्हताच मुळी. "तुला हवं ते कर आणि मला हवं ते करु दे." या विचारसरणीचा तो होता. खरतर त्याची कसलीच कटकट नव्हती...ना खाण्याचा त्रास ना घरातील कामांचा ना कुठल्या व्यवहाराचा. तो टिपिकल इंडियन हसबंड नव्हता. ते दोघं म्हणजे स्वतंत्र विचारांचे दोन लोकं एका छताखाली रहात होते, एकमेकांच्या स्वातंत्र्याला धक्का न लावता. वरवर वाटतं या गोष्टीचं आकर्षण पण संसारात कुठेतरी बांधिलकी असावी इतक्या वर्षांनी तिला हे प्रकर्षानं जाणवत होतं. तिच्या मैत्रीणी मात्र याबाबतीत तिचा खूप हेवा करायच्या. अरुंधतीला मात्र तिच्या संसारात अधेमधे कधीतरी भांडण..रुसवे..फुगवे हवे होते...

"अखि, तू आज ऑफिसमध्ये नाही जाणार?" अरुंधतीने ब्रेकफास्ट देत त्याला विचारलं

"नाही ग. एक महत्वाचं प्रेझेंटेशन करायचं आहे. ते झालं की निघणार. तू आवर तुझं. मी सोडून देऊ का?" अखिलेश ने लॅपटॉप चार्जिंगला लावत विचारलं

"नको, मी जाईन रे." अरुंधती

"का ग! काय झालं? एकदम शांत झालीस." अखिलेश

"अरे तुझ्यासाठी लंच करुन ठेवावा का या विचारात होते." अरुंधती स्वत:ला सावरत म्हणाली

"असू दे. कंपनीचं कॅंटीन कशासाठी आहे मग?" अखिलेश

नेहमीसारखं ती तयार झाली. अखिलेशच आज असं घरी थांबण तिला काही तरी विचित्र वाटत होतं. अनेक वर्षांचा त्याचा ठरलेला दिनक्रम. सकाळी पाऊणे आठला घरुन निघायचं. रात्री आठ वाजता परतायचं. गेल्या दोन महिन्यात त्याची परदेशवारी झाली नव्हती. नाही तर महिन्याआड पंधरा-वीस दिवसाची परदेश फेरी ठरलेली. शनिवार-रविवारची सुट्टी सायकलींगमध्ये आणि ब्लॉग लिहिण्यात घालवायची. मित्रांच्या आग्रहास्तव गेलेच तर एखादी सहल. अखिलेशबद्दल माहित नाही, पण आयुष्यातील हे चक्र अरूंधतीच्या अंगवळणी पडलं होतं. तिचं सोशल नेटवर्क असलं तरी ती लोकांमध्ये फार रमत नव्हती. आपण बरं आणि आपलं घर बरं, सोबतीला पेंटिगचा छंद होता. बाहेर भटकण्यापेक्षा कॅनवॉस, रंग, क्लासिकल इंस्ट्रुमेंटल म्युझिक ही तिची आवडती कंपनी. तिनं तिच्यासाठी रचलेलं तिचं हे चक्रव्यूह...तिला खूप आवडायचं.

आज तिच्या या चक्रव्यूहाला तडा गेला होता.

"चल, येते मी." अरुंधती चप्पल अडकवत म्हणाली

"अग! घराची किल्ली घे. तू पण ना...! का ग अशी गोंधळलीस का?" अखिलेशने तिच्या हातात किल्ली देत विचारलं

"काही नाही रे.." अरुंधती भानावर येत म्हणाली

"सतत कुठल्या विचारात हरवून जातेस तू?" अखिलेशनं काळजीनं विचारलं

"विचार कुठला? आज पेंटिंग पूर्ण करायचं आहे मला. कोणते रंग आणायचे तोच विचार करत होती." अरुंधती

"ओके. मग मी तुला दवाखान्यातून पिक-अप करतो. व्हिनसमध्ये जाऊ, जमलं तर दगडूशेठ नंतर येतांना दुर्वांकुरची थाळी, काय म्हणतेस?" अखिलेश लाडात येत म्हणाला

"ओके....आता निघू मी.." अरुंधती

"आय वील बी देअर बाय सीक्स थर्टी शार्प. बाय" अखिलेश लिफ्टचं बटन दाबत म्हणाला

रंगीला रे....तिने दबक्या आवाजात गाणं गुणगुणलं....तिला माहित होतं आज रंगीला येणार नाही...त्याला राग आला असेल....

तिने सोसायटीच्या गेटच्या आसपास नजर भिरकावली...रंगीला कुठेच दिसला नाही. रिक्षा करुन ती दवाखान्याकडे निघाली.

"गुड मॉर्निंग, अरुंधती. कशी आहेस?" डॉ.शुभदाने तिला आत येताच विचारलं

"मी मस्त. आज तुम्ही लवकर आल्यात मॅडम?" अरुंधतीने पेशंट लीस्ट चेक करत विचारलं

"हो, गावावरुन नात्यातली पेशंट चेक-अपसाठी येणार होती. म्हणून ग...." डॉ.शुभदा

"प्राचीची केस डिस्कस करायची आहे. लंचनंतर भेटू या?" डॉ.शुभदा

"ओके." अरुंधती

आज काऊनसीलींगसाठी भरपूर पेशंटस होते. चांगल्या भविष्याचं अमिश देऊन पेशंटची ट्रीटमेंटसाठी ती मानसिक तयारी करुन घेत असे. रोज एक नवा अनुभव. ट्रीटमेंट संपली... केस संपली... कधी पेशंट संपला.... केस संपली.... काउंन्सीलींग... समुपदेशन.... म्हणजे नक्की काय तर कोणीतरी निर्माण केलेले प्रश्न आपण सोडवत बसायचे...हे तिचे तिच्या प्रोफेशनबद्दल स्पष्ट मत होते.

प्रत्येक व्यक्ति, ती स्त्री असो वा पुरुष, कोणत्याही वयोगटातील असो, अगदी लहान बाळापासून ते वयोवृद्ध असो, ती आपल्या भावनांच्या अतिरेकाने निर्मित आभासी जगात वावरत असते. जोवर व्यवाहारिक जीवनाचा आणि या आभासी जगाचा ताळमेळ साधला जातो तोवर सगळयांच व्यवस्थित सुरु असतं. अंगवळणी पडलेल्या या तडजोडीतील आयुष्याला एकदा का तडा गेला की त्या व्यक्तीचा मानसिक तोल ढासळतो. आणि पैसे देऊन या विषयात शिक्षण घेतलेले आम्ही त्यांच्या मानसिक संतुलनावर क्लिनीकल भाषेतील अवजड शब्द वापरुन एका मानसिक आजाराचे नाव देतो आणि उपचार करतो. उपचार म्हणजे तरी काय? तर आमच्यासारख्यांनी फार पूर्वी केलेले प्रयोग त्यात उपयुक्त बदल करुन आम्ही परत तेच ते करतो. तेच नोटस काढतो. अवलोकन करतो. औषधं देतो. आप्तेष्टांना मानसिक आधार आणि काळजी घ्यायला सांगतो.

अरुंधतीने आपल्या करिअरमध्ये आयुष्याचे अनेक रंगरुप बघितले होते.....काही ती विसरुन जायची तर तिच्या विचारात घुटमळणाऱ्या केसचे प्रतिबिंब तिच्या पेंटिंगमध्ये उमटत असे.

"मे आय कम इन?" अरुंधतीने डॉ.शुभदाच्या केबीनचे दार उघडत विचारले

"कम, आय ॲम वेटिंग फॉर यू डियर." डॉ.शुभदा

"ही प्राचीची फाईल. यात मी सगळं नोट डाऊन केलं आहे." अरुंधती

"सगळं म्हणजे? एक्सप्लेन" डॉ. शुभदा

"सगळं म्हणजे, ती..तिचं आयुष्य...तिला होणारे भास...तिचं स्वत:शी बोलणं...सगळं.." हे सांगतांना अरुंधतीला कापरं भरलं

"प्लीज पुट एवरी थिंग इन मेडिकल टर्म" डॉ.शुभदा

"आय कान्ट...." अरुंधती नजर चुकवत म्हणाली

"का नाही?" डॉ.शुभदा

"तुम्ही तिची केस अभिधाकडे दिली आहे. ती सांगेल तुम्हाला."अरुंधती

"हॅलो श्वेता, अभिधाला केबीनमध्ये पाठव. आणि हो, तासभर कोणालाही आत पाठवू नको." डॉ.शुभदाने इंटरकॉमवर सांगितलं

"अरुंधती, प्राचीचं काऊंसीलींग करता करता तुझी आणि तिची मैत्री झाली. तुमच्या मैत्रीला माझी काहीच हरकत नाही. पण त्याचा केसवर परिणाम होतांना दिसत होता म्हणून मला ती अभिधाकडे द्यावी लागली" डॉ.शुभदा

त्या क्षणी डॉ.शुभदाचं बोलणं तिला आवडलं नसलं तरी ते खरं होतं. प्राची आणि तिची छान मैत्री झाली होती. इतकी मैत्री की प्रोफेशनल एथिक्स विसरुन तिने तिच्या काही काऊंसीलींग टेस्ट घेतल्या नाहीत. असं तिनं का केलं तिला माहित नसलं तरी ते चूकीचं आहे हे तिला जाणवत होतं....तरीही...तिनं ते केलं....

"आय एम सॉरी.." अरुंधतीच्या डोळयाच्या कडा पाणावल्या

"नो टिअरस...? मला माहिती आहे. प्रोफेशनल लाइफमध्ये असं परसनल होऊन चालत नाही." डॉ.शुभदा

"मे आय कम इन..." अभिधाने केबीनचं दार उघडत विचारलं

"ये...तुझीच वाट बघत होतो." डॉ.शुभदा

"तुम्ही कशा आहात?" दोघींकडे बघत अभिधाने विचारलं

"आपण इतर काहीही न बोलता थेट प्राचीच्या विषयाकडे वळू या." डॉ.शुभदा

"यस मॅम. हिअर आर माय फांडिंग्स....आणि हा सगळा रिपोर्ट." अभिधाने फोल्डरमधले पेपरस टेबलवत ठेवत म्हंटलं

"ओके, याचा अर्थ प्राचीचं वागणं बरचसं नॉर्मल आलं आहे. अजून किती वेळ लागेल?" डॉ.शुभदा

"जर अरुंधती मॅडमनी मला मदत केली तर लवकरच पूर्ण होईल" अभिधा

"अरुंधतीची मदत?" डॉ.शुभदा

"हो मॅम. माझं नाही पण प्राची अरुंधतीने सांगितलेल्या सर्व गोष्टी ऐकते. त्यांनी जर प्राचीशी संवाद साधला तर ही केस लवकर रिसॉल्व होऊ शकते." अभिधा

"मला वाटतं लवकरात लवकर तिचं अबॉर्शन व्हायला हवं. तिला मूल नको आहे." अरुंधती

"नाही मॅम. तिला मूल झालं तर तिचं सगळं लक्ष मुलावर केंद्रित होईल...आणि या समस्येचं तेच समाधान आहे." अभिधा

"आणि समजा तिला मूल सांभाळता आलं नाही तर?" अरुंधती

"आपल्याला तिच्या मनातील नेमकी हीच भिती काढायची आहे. ती एक चांगली आई होऊ शकते हा विश्वास तिला येऊ शकतो." बोलतांना अभिधाचा आवाज जरा चढला होता

"ओके....मी आज हे सर्व रिपोर्टस वाचते. उद्या आपण परत यावर चर्चा करु. मी एकदा डॉ. परांजपेंना हे रिपोर्टस दाखवते." डॉ.शुभदा

"अरुंधती, प्लीज यावर एकदा परत विचार कर. मी सगळे रिपोर्टस तुला मेल करते. तू प्राचीची केस सोडल्यापासून तिच्यात बराच फरक पडला आहे." अभिधा

"ओके... बघते" म्हणत अरुंधती लायब्ररीत निघून गेली

आत्ताशी फक्त पाच वाजलेत. ही अभिधा पण न...प्राचीच्या केसबद्दल मला जे माहिती आहे ते तिला काय ठाऊक? मला माहिती आहे, प्राचीला मूल नको.... त्या दिवशी रंगीलाकडे प्राचीबद्दल बोलायला हवं होतं. वेळच मिळाला नाही. आज बोललो असतो तर आज अखिलेश घ्यायला येणार....आज सकाळी भेट झाली नाही...संध्याकाळी भेट होणार नाही. अखिलेशला पण आजच घरी थांबायचं होतं. रंगीला, काय रे तू एकदा धाडस करुन ये ना अखिलेशसमोर.....मी कुठल्याही परिणामासाठी तयार आहे रे. एकदाच धाडस कर.. एकदाच.

रंगीला रे...तेरे रंग में यूं रंगा है

मेरा मन...

छलिया रे ना बुझे है

किसी जल से ये जलन..... ती गुणगुणत होती.

# ४

रंगीला, काय रे तू एकदा धाडस करुन ये ना अखिलेशसमोर.....मी कुठल्याही परिणामासाठी तयार आहे रे. एकदाच धाडस कर.. एकदाच.

अखिलेश साडे सहावाजता येणार आहे. घरी जायच्या आधी प्राचीला भेटायला हवं, अरुंधतीच्या मनात आलं. तेवढ्यात मोबाईलवर नोटिफिकेशन आलं. अभिधाचा मेल होता. प्राचीचे रिपोर्टस होते. मोबाईलवर तिचे रिपोर्टस स्क्रोल करत करत ती श्वेताच्या केबिनमध्ये गेली.

"श्वेता, मी अभिधाच्या म्हणण्यावरुन प्राचीला भेटते आहे." अरुंधती

"हो, अभिधाने सांगितलं होतं." श्वेता

"थँक्स." म्हणत अरुंधती प्राचीला भेटायला गेली

खरं तर प्राचीची केस तिच बघत होती. दोघींची छान मैत्री जमली होती. ती त्या केसमध्ये इतकी गुंतली की तिला तिच्या प्रोफेशनचं भान राहिलं नाही. प्राचीचा मानसिक आजार बरा करता करता ती नकळत तिच्यात आणि तिच्या केसमध्ये गुंतत गेली. प्राचीचा आजार बरा होण्याएवजी वाढत गेला. प्राचीचे भास वाढत गेल्यामुळे तिच्याकडून ही केस काढून घेण्यात आली.

"प्राची, कशी आहेस?" अरुंधतीने तिचा हात हातात घेत विचारलं

"मी नाही बोलणार? तू येत नाही ना मला भेटायला?" प्राचीने रागाने विचारलं

"सॉरी.....वेरी सॉरी. काम होतं न म्हणून आले नाही ग." अरुंधती

"आता मला नवीन मैत्रीण मिळाली आहे. ती पण छान आहे....अभिधा नाव तिचं." प्राची

"काय म्हणाली अभिधा...." अरुंधती

"ती म्हणाली की रोमिओ वेडा आहे....त्याला भेटू नको....सुदर्शन पण तेच म्हणत होता." प्राची

"खरचं रोमिओ वेडा आहे का? मी बोलवत नाही त्याला आता. आणि तो पण हल्ली येत नाही मला भेटायला" प्राची

"हो...हो...वेडा आहे तो...." अरुंधतीला हे सांगतांना त्रास होत होता

"आणि तुझा रंगीला...तो शहाणा आहे का?" प्राची

"रंगीला.....तुला कसं आठवलं?" अरुंधतीनं आश्चर्याने विचारलं

"तूच सांगत होती ना...." प्राची

"तू हे अजून कोणाला सांगितलं आहे?" अरुंधती

"माहित नाही...आठवत नाही.." प्राची

"हॅलो मॅडम, तुम्हाला प्राचीशी बोलतांना बघून छान वाटलं." तेवढ्यात अभिधा आत येत म्हणाली

"ओके. प्राची...अभिधा सांगते तसं वागायचं. मला कळलं की तू तिचं ऐकत नाही." अरुंधती

"ओके.. तू म्हणते तर ऐकते. माझं जेवढं कौतुक रोमिओ करतो तेवढं सुदर्शन करत नाही अजूनही." प्राची

"मी सांगते सुदर्शनला.." अरुंधती

"मग सुदर्शनला रोमिओ म्हणणार मी..." प्राची आनंदानं म्हणाली

"चल आराम कर. अभिधाचं ऐकत जा." अरुंधती तिचा हातातून हात सोडवत म्हणाली

"अभिधा, आपण बोलू शकतो का?" अरुंधती

"मला आवडेल तुमच्याशी प्राचीबद्दल चर्चा करायला." अभिधा

"मी सगळे रिपोर्टस बघितले. तू म्हणते तशी ती भास-आभासाच्या चक्रातून बाहेर पडली असली तरी थोडीशी निष्काळजी तिला परत त्याच चक्रात नेऊ शकते." अरुंधती

"हो मॅडम. फिफ्टी-फिफ्टी चान्स आहे. मी सुदर्शन यांच्याशी यावर चर्चा केली आहे. ते तयार आहेत." अभिधा

"सुदर्शन, जर तिच्या रोमिओ संकल्पनेत थोडा जरी कमी पडला तर आपण प्राचीला गमावून बसू. त्यात ती गरोदर आहे. आपल्याकडे अॅबॉर्शनसाठी काहीच दिवस शिल्लक आहेत. जर सुदर्शन शंभर टक्के रोमिओ ठरला तरच ती मातृत्व स्विकारेल, अन्यथा सिच्युएशन आणखिनच गंभीर होईल. याचा विचार केला आहेस का तू?" अरुंधती

"हो मॅडम, रिस्क तर घ्यावी लागेलच न. कुठे न कुठे रिस्क फॅक्टर इनवॉल्व असणारच न." अभिधा

"आय नो. आय वील सजेस्ट यू टू टेक मिनिमम रिस्क......सर्च फॉर मिनिमिम रिस्क फॅक्टर अॅन्ड देन डिसाईड. इट्स माय ओपिनियन. यू कॅन कनसल्ट डॉ.परांजपे." अरुंधती

"ओके. मॅडम, डॉ.शुभदां आपल्याला केबीनमध्ये बोलवत आहे" अभिधा

"ओके, मी पुढे होते. तू ही ये लगेच" अरुंधती

अभिधा अरुंधतीला पाठमोरी बघत राहिली. ब्रिलियंट आणि सखोल विचार करणाऱ्या अरुंधतीचं आपल्याला नेमकं काय खटकत आहे, अभिधाला कळत नव्हतं. कधीकधी ती ही भासआभासाच्या चक्रात अडकल्यासारखी वाटते. काय, मी पण न. काय काय विचार करत सुटते स्वत:च्याच विचारांवर अभिधाला हसू आलं. असो, मानवी मन हे किती गूढ आहे आणि असू शकतं याचा प्रत्यय तिला प्रत्येक केसमध्ये अनुभवायला मिळत होता. प्राचीच्या केसमध्ये रिस्क आहे हे तिला ठाऊक होतं.

"डॉक्टर, फक्त दहा मिनटं. प्राचीबद्दल महत्वाचं बोलायचं आहे." अरुंधतीने केबीनचं दार उघडत म्हंटल

"अभिधा कुठे आहे?" डॉ.शुभदा

"येतेच आहे." अरुंधती

"मॅडम, अभिधा घाई करते आहे. मला असं वाटतं एकदा डॉ.परांजपेंना कन्सल्ट करायला हवं." अरुंधती

"मला माहित आहे. प्राचीच्या पुढच्या ट्रीटमेंटची मी अजून अभिधाला परमिशन दिली नाही. आणि ती पण असं काही करणार नाही. आय नो." डॉ.शुभदा

"यस मॅडम." अभिधा केबीनच्या आत येत म्हणाली

"प्राचीचं वागणं अजूनही बालिश आहे. आई होण्यासाठी ती मानसिकरित्या तयार नाही. जोपर्यंत सुदर्शन तिच्या रोमिओच्या संकल्पनेत पूर्णपणे खरा उतरत नाही, तोवर तिने आई होणे योग्य नाही. अभिधा म्हणते तसं आई झाल्यावर तिचं लक्ष बाळावर केंद्रीत होईल, पण बाबा म्हणून सुदर्शनकडून तिच्या अपेक्षा दुणावल्या असतील. यात सुदर्शनचा पण विचार करा. तो प्राची आणि बाळ कसं मॅनेज करेल. ती नॉर्मल झाल्यावर ते नंतर चान्स घेऊ शकतात." अरुंधती

"माझं हेच मत आहे." डॉ.शुभदा

"उद्या डॉ.परांजपेंचा राऊंड आहे. सुदर्शनला बोलवून घ्या. मला असं वाटत पुढच्या आठवड्यात अबॉर्शन करायला हरकत नाही." डॉ.शुभदा

"थॅंक्स डॉक्टर" अरुंधती

"सहा वाजलेत. मला निघायचं आहे. उद्या भेटू" अभिधा

तिथून निघून अरुंधती सरळ लायब्ररीत गेली. प्राचीने अभिधाला रंगीलाबद्दल सांगितलं असेल तर? छे.शक्य नाही. सांगितलं असतं तर मला अभिधाने या केसमध्ये इनव्हॉल्व केलं नसतं. रोमिओ...रंगीला....दोन्ही नाव तिच्या डोक्यात पिंगा घालत होते.

रंगीला, आय नीड यू. मला माहित आहे जे मी करते ते चूक आहे. तरीही मला तुझी गरज आहे. असं दुहेरी किती दिवस जगणार रे. रंगीला...डोळे बंद करुन ती रंगीलाचा विचार करत होती. मनोमन तिला माहित होतं आज तो तिला भेटणार नाही. ही वेळ एक ना एक दिवस येणार रे. लेट्स फेस टुगेदर. हा विचार येताच अनामिक भितीने तिचं अंग शहारुन गेलं. हातापायातली..अंगातली शक्ती हळुहळु क्षीण होत होती.

रंगीला रे...तेरे रंग में यूं रंगा है... मेरा मन...छलिया रे...पलकों के झुले से, सपनों की डोरी,प्यार ने बांधी जो, तुने वो तोडी

खेल ये कैसा रे, कैसा रे साथी, दिया तो झुमें है, रोये है बाती, कहीं भी जाये रे, रोये या गाये रे,चैन ना पाये रे

ती गुणगुणत होती.

# ५

तिने डोळे उघडले तर डॉ.शुभदा तिचं ब्लडप्रेशर चेक करत होत्या.

"मी इथे कशी काय? मला काय झालं?" अरुंधती

"काही नाही. यू विल बी फाईन सून." अखिलेश तिच्या डोक्यावरुन हात फिरवत म्हणाला

"डोन्ट स्ट्रेस युअरसेल्फ." अभिधा

"मला काय झालं? मी दवाखान्यातून निघाले होते." अरुंधतीला काही कळत नव्हतं

"हो..हो...अग गेटजवळ तू चक्कर येऊन पडली. सिक्युरिटीने तुला आत आणलं. आता तू ठिक आहेस. काही टेस्ट लिहून देते. सगळे रिपोर्टस नॉर्मल असतील तर उद्या डिस्चार्ज देऊ." डॉ.शुभदा

"जसं तुम्ही म्हणाल डॉक्टर." अखिलेश

"अभिधा, श्वेता टेक केअर ऑफ हर. अखिलेश, आय वॉन्ट टू टॉक टू यू." डॉ.शुभदा

"यस मॅडम. मी काही प्रश्न विचारु का त्यांना?" अभिधा

"ओके. तिला त्रास होता कामा नये." डॉ.शुभदा

"आय वील टेक केअर मॅडम. डोन्ट वरी." अभिधा

"हॅलो अरुंधती. आता कसं वाटतय?" श्वेता

"मी ठिक आहे. पण मी इथे कशी आले सांगशील का?" अरुंधती

"सांगितलं न तुला...चक्कर आली म्हणून.." श्वेता

"पण निघतांना मी ठिक होते. अखिचा मॅसेज आला...तो दहा मिनटात पोहचतोय...मी निघाली...नंतरचं काही आठवत नाही बघ." अरुंधती

"ओवरएक्झरशन किंवा स्ट्रेसने होतं असं. काळजी नको करु." श्वेता

"काळजी कशी नको करु....रंगीलाला भेटायचं होतं. आधीच चिडला होता तो आता अजून चिडेल..." अरुंधती पुटपुटली

"कोणाला भेटायला जायचं होतं?" अभिधा

"कोणी नाही." अरुंधती कड बदलत म्हणाली

"टेक रेस्ट. मी मॅडमला भेटून येते." अभिधाने अरुंधतीच्या अंगावर पांघरुण नीट करत म्हंटल

"मे आय कम इन मॅडम" अभिधा ने डॉ.शुभदाच्या केबीनचं दार उघडत विचारलं

"ये. काही अर्जंट?" डॉ.शुभदा

"यस मॅडम. आत्ता अरुंधती रंगीला रंगीला पुटपुटत होती. तुम्ही ओळखता कोणी रंगीला ला?" अखिलेशकडे बघत अभिधाने विचारलं

"नाही. या नावचं आमच्या नात्यात कोणी नाही...कोणी मित्र ही नाही." अखिलेश

"एक्झॅक्टली. मॅडम ही केस प्राची मॅडमसारखी तर नाही ना?" अभिधा

"मे बी......मी सांगते त्या टेस्ट कर. आजच काउन्सीलींग सेशन घे." डॉ.शुभदा

"ओके. मि.अखिलेश मला तुमच्याकडून काही माहिती हवी आहे." अभिधा

"बोला मॅडम" अखिलेश

"तुम्हाला तिच्या वागण्यात काही बदल जाणवला?" अभिधा

"हो. हल्ली ती बाहेर जायचं, सगळयांसोबत रहाणं-फिरणं टाळायला लागली होती. मला वाटलं तिचा कामाचा वाढता व्याप आणि तिच्या आर्ट गॅलरीतील काम वाढले होते. आणि हो. मध्यंतरी मी सतत परदेशात जात-येत असल्यामुळे तिने बरेच विकेन्ड मैत्रीणींसोबत घरच्यांसोबत इच्छा नसतांना बाहेर घालवले. सो मला वाटलं या कारणामुळे ती बाहेर पडत नसावी." अखिलेश

"रंगीलाबद्दल कधी काही बोलली?" अभिधा

"नाही. रंगीला.........ती सतत गाणं गुणगुणते....रंगीला रे यूं रंगा हैं...हो म्हणजे पेंटिग्स करतांना...किचनमध्ये काम करतांना." अखिलेश

"अजून काही आठवतय? " अभिधा

"आज मी घरी थांबलो तर तिला आश्चर्य वाटलं. कारण ठाऊक नाही. पण माझ्या थांबण्यामुळे वैतागली होती इतकं नक्की." अखिलेश

"अरुंधतीला इतक्यावर्षात एक ठराविक रुटिनची सवय झाली होती. त्यात व्यत्यय आला की रिजर्व्ह असलेल्या व्यक्तींना त्या व्यत्ययाचा त्रास होतो. अरुंधती जरी एक एक्पर्ट सायकॉलॉजिस्ट असली तरी ती रिझर्व्ह नेचरची होती. असे लोकं लवकर ओपनअप होत नाही." डॉ.शुभदा

"याचा काय अर्थ डॉक्टर? अरुंधती.." अखिलेशने काळजीच्या सुरात विचारले

"काळजी नका करु. आम्ही आहोत. तुम्ही तिच्याजवळ थांबा." डॉक्टर शुभदा

"इटस ऑल माय फॉल्ट. मी तिच्याकरता वेळ काढू शकलो नाही." अखिलेश जाता जाता म्हणाला

"अभिधा, आता बोल." डॉ.शुभदा

"मॅडम, मला वाटतं रंगीला नावाची कोणती व्यक्ती अस्तित्वात नाही." अभिधा

"आर यु शुअर?" डॉ.शुभदा

"यस. कारण मी त्यांना एक दोनदा बसस्टॉपवर आणि आपल्या गेटवर कोणाशीतरी बोलतांना बघितलं. कानात इअरफोन बघिलल्यावर मला वाटलं त्या फोनवर बोलत असाव्यात. नंतर त्यांनी हात दाखवला...तिथे कोणीच नव्हतं." अभिधा

"इतक्यात तिच्या वागण्यातला बदल मला लक्षात आला होता." डॉ.शुभदा

"मॅडम, त्यांनी हे दोन लाइफ, एक इमॅजिनरी आणि प्रॅक्टिकल लाइफ कसं मॅनेज केलं असेल? आपण प्राचीची केस बघतोय मॅडम. असं वागणं फार काळ लपून राहात नाही. आणि आज त्यांना चक्कर आल्यामुळे याचा आपल्याला उलगडा होतो आहे. नाही तर कळलं नसतं" अभिधा

"हो. त्याचच आश्चर्य वाटत आहे मला. आता मात्र काळजी घ्यायला हवी. मी लगेच डॉ.परांजपेना बोलवते. अभिधा, आपल्याला रंगीलाबद्दल माहिती आहे हे अरुंधतीला कळता कामा नये" डॉ.शुभदा

"यस मॅडम" अभिधा खुर्चीवरुन उठत म्हणाली

"अखि, मला काही झालं नाही रे." अरुंधती बेडवरुन उठत म्हणाली

"रिलॅक्स.....डोन्ट स्ट्रेस युअरसेल्फ. तुला काहीही झालं नाही." अखिलेश

"कशी आहेस अरुंधती?" अभिधा

"मी ठीक आहे. तू माझं सेशन घ्यायला आली आहेस न." अरुंधती

"नाही. म्हणजे...काही प्रश्न विचारायचे आहेत बस्स...फॉर्मॅलिटिज अजून काही नाही." अभिधा कचरत म्हणाली

"गो अहेड" अरुंधती

"अग, विचार काय विचारायचं आहे ते?" अरुंधती वैतागून म्हणाली

अभिधाच्या शांततेचा अर्थ लक्षात येताच अखिलेश रुमच्या बाहेर गेला.

अभिधाने डॉ.परांजपेंसाठी रुमचा दरवाजा उघडा ठेवला. अरुंधतीच्या पाठीमागे उशी लावत अभिधा डायरी पेन घेऊन बेडसमोरच्या खुर्चीवर बसली.

बराच वेळ अरुंधती डोळे मिटून बसली होती. औषधांमुळे तिला ग्लानी आली होती. डॉ.परांजपे आल्याचा श्वेताचा मॅसेज बघून तिने सुरवातीचे ठरलेले प्रश्न नाव, गाव, शिक्षण, व्यवसाय, छंद, इत्यादी. विचारायला सुरवात केली. यावर तिने समाधानकारक उत्तर दिले. डॉ.परांजपे येऊन अभिधाच्या मागे बसले. "तूच विचार" त्यांनी खुणेनी अभिधाला सांगितले.

"यापूर्वी घेतलेली मेडिकल ट्रीटमेंट?" अभिधा

"हो." अरुंधती

"कोणती?" अभिधा

"बारा-तेरा वर्ष झाले असतील" अरुंधतीने डॉ.परंजपेंकडे  बघत उत्तर दिलं

"हो. तरी सांगावी लागेल." अभिधा

डॉ.परांजपेच येणं अरुंधतीला अपेक्षित असलं तरी ते तिला आवडलं नसल्याचं तिच्या वागण्यातून कळत होतं

"लग्नाला वर्ष झालं होतं. सुरवातीला वारंवार मिस कॅरेजेस झाले. ट्रीटमेंट घेतली खरी पण उपयोग झाला नाही. मी समजवलं अखिलेशला की आपण एखादं मूल दत्तक घेऊ. त्याला ते मान्य नव्हतं. नंतर बरेच वर्ष आमची वादावादी सुरु होती. अखिने माझं ऐकल नाही. नंतर मग आई व्हायचं स्वप्न बघणं मीच सोडून दिलं. तेव्हा काऊन्सीलींग सेशन्स झालीत. मग मीच माझा एकटेपणा पांघरला आणि आयुष्य नव्याने सुरु केलं." अरुंधती

"मी ऐकतेय अरुंधती. रिलॅक्स हो आणि जे आठवतय ते तू मला सांगू शकते." अभिधा

"आधी एका शाळेत काउन्सीलरम्हणून काम केले. नंतर डॉ.कुमारकडे आणि एका कॉमन फ्रेंडच्या मदतीने चारवर्षांपासून डॉ.शुभदाकडे काम करतेय." अरुंधती

"डॉ.शुभदा तुमचं नेहमी कौतुक करत असतात." डॉ.परांजपे

"इथे आल्यावर इतर पेशंटचे त्रास बघितल्यावर माझा त्रास कुठल्याकुठे पळून जायचा. मग काही रिसर्चपेपर पब्लिश केले." अरुंधती

"आवडती मैत्रीण किंवा मित्र?" अभिधा

"आहेत. इतक्यात फारसं भेटत नाही कोणाला. हल्ली जो तो आपापल्या विश्वात आणि मुलांमध्ये गुंग असतो. " अरुंधती

"प्राची तुमची जवळची मैत्रीण आहे न." अभिधा

"हो. ट्रीटटमेंट करता करता छान मैत्री जुळली आमची."अरुंधती

"तो तिचा भासमित्र रोमिओ..."अभिधा

"खरं सांगू का? मला गरज नाही ग मित्रमैत्रीणींची. पेंटिग ...रंग माझे आवडते मित्र आहेत." अरुंधती रोमिओचा विषय टाळत म्हणाली

"हो. मॅडमच्या केबीनमध्ये तुमचं पेंटिंग बघितलं मी. खूप सुंदर आहे." अभिधा

"त्यांच्या वाढदिवसाला दिलं होतं." अरुंधती आता खुलली होती

"अखिलेश.." डॉ.परांजपे

"त्याला कुठे माझी पर्वा? आज दत्तक का होईना मला आई म्हणणारं कोणी असतं." अरुंधतीचे डोळे पाणावले होते

"मग, तुमची पर्वा करणारं कोण आहे तुमच्या आयुष्यात?" अभिधा

"आहे ना. माझा रंगीला....." अरुंधती भावनेच्या भरात बोलून गेली

"ग्रेट. मला नाव आवडलं. पूर्ण नाव काय त्यांच?" अभिधा

"रंगीला....फक्त रंगीला...." अरुंधती

"कुठे रहातात?" अभिधा

"माहित नाही." अरुंधती

"काही फोन नंबर?" अभिधा

"फोन नाही वापरत तो." अरुंधती

"ओके. कुठे भेटेल आता?" अभिधा

"तो फक्त मी बोलवलं की येतो. इन दिस वर्ल्ड ही एक्सीस्ट ओन्ली फॉर मी....डोन्ट यू अंडरस्टॅन्ड....ही एक्सीस्ट ओन्ली फॉर मी...."अरुंधती चिडून म्हणाली

"आणि या अखिलेशच्या अनप्रेडिक्टेबल रुटिनमुळे मला गेले तीन दिवस त्याला भेटता आला नाही. कित्ती चिडला असेल तो माझ्यावर." अरुंधतीच्या बोलण्यातील राग वाढत होता

अरुंधतीचा बांध फुटला होता. रंगीला अस्तित्वात असल्याचा हट्ट अरुंधती सोडत नव्हती. जेव्हा तिने सांगितले की ती रोज त्याच्यासोबत दवाखान्यात येते, केसेसवर चर्चा करते, ते दोघं बसमध्ये प्रवास करतात....अखिलेश तर ऐकून उडालाच.

तिला शांत करत डॉ.परांजपेनी तिला औषध दिलेत. काही वेळातच थकलेली अरुंधती गाढ झोपी गेली.

त्या निरागस चेहऱ्याकडे अखिलेश बघतच राहिला. त्याची चूक त्याला लक्षात आली असली तरी खूप मोठा काळ हातातून निसटून गेला होता. अरुंधतीने तिचा जगण्याचा आधार शोधला होता....अखिलेशला रंगीलाची जागा कशी घ्यायची हा यक्षप्रश्न त्रास देत होता. तेवढ्यात अभिधा त्याला बोलावयला आली.

"अखिलेश सर. मॅडम बोलवत आहे. मी थांबते तिच्याजवळ" अभिधा

"रंगीलाची जागा घेणं तुला जरी अशक्य असलं तरी अरुंधतीला यातून बाहेर तूच काढू शकतो." डॉ.शुभदा

दवाखान्यातील त्या खोलीत ..अखिलेश...डॉ.परांजपे आणि डॉ.शुभदा होत्या. त्या अखिलेशला समजवून सांगत होत्या.

"आय जस्ट वंडर हाऊ शी मॅनेज लीवींग विथ इमाजनरी फ्रेंड ॲन्ड दॅट टू ॲट इझ." डॉ.परांजपे

"प्राची, आमची एक पेशंट होती. तिची ट्रीटमेंट अरुंधती करत होती. तिचा एक भासमित्र...इमॅजिनरी फ्रेन्ड तिने तयार केला होता. तिच्या तिच्या नवऱ्याकडून ज्या ज्या अपेक्षा होत्या त्या ती भासमित्र रोमिओकडून पूर्ण करत होती. अरुंधतीने एक

प्रयोग म्हणून रंगीलाची निर्मिती केली असावी. तो जे बोलायचा जे वागायचा...ते फक्त आणि फक्त जे अरुंधतीच्या मनातलं आणि मनासारखं....मग काय अरुंधतीला ते आवाडायला लागलं आणि ती रंगीलामध्ये गुंतत गेली." डॉ.शुभदा

"अखिलेश, तिच्या आयुष्यात जे महत्व रंगीलाला आहे तेवढच तुला आहे.... थोडक्यात तुम्ही दोघं तिच्या आयुष्यात समांतर चालत आहात. सध्या परिस्थिती अशी आहे की तिला तुमच्या दोघांसोबत रहायचं आहे." डॉ.परांजपे

"मात्र आपल्याला रंगीलाला तिच्या आयुष्यातून नकळत काढून टाकायचं आहे. कठीण आहे पण अशक्य नाही." डॉ.शुभदा

"इनफॅक्ट मी तिला कालच म्हंटलं, की तुला काही त्रास असेल तर आपण डॉ.शुभदाशी बोलु...पण ती नाही म्हणाली." अखिलेश

"अखिलेश, अरुंधतीचं नशीब बलवत्तर म्हणून आपल्याला काही कॉम्प्लिकेशन व्हायच्या आत सर्व कळलं....अरुंधती ही रंगीलासोबत निघून गेली असती...आय मीन समटाईम इट हॅपन्स...त्यांनी जर ठरवलं की पुर्ण आयुष्य त्या काल्पनिक व्यक्तिसोबत घालावायचं...तर आपण काहीच करु शकलो नसतो." डॉ.परांजपे

"अजूनही वेळ गेली नाही. आपण सगळे मिळून तिला यातून बाहेर काढू शकतो." डॉ.शुभदा

---------०००००----------

तिकडे खोलीत अरुंधती मंद हसत होती.

"रंगीला, ए रंगीला. तू सांगितलं तसच मी केलं. तू सोडून नाही ना जाणार आता मला." अरुंधती

"नाही ग. आता तर मी तुझ्या घरी तू म्हणशील तेव्हा येऊ शकतो....कोणाला कळणारही नाही. खरच हुशार आहेस तू." रंगीला

"कोणाला माझी हुशारी कळलीच नाही. रंगीला, एक ना एक दिवस त्यांना हे कळलच असतं. मी अभिधाला आलेल्या शंकेचा फायदा घ्यायचं ठरवलं. आता मी भास-आभास यांच्याही पलीकडे गेले आहे. मला कळतय तू माझं इमॅजिनेशन आहे. पण महत्वाचं म्हणजे तू माझी गरज आहे....हे त्या केबीनमध्ये बसलेल्या तिघांना कळत नाही. ते आता मला तुझ्यापासून दूर करायचा प्रयत्न करतील...."

"मग?" रंगीला

"मग काय? मी त्यांच्यासाठी तुला विसरायचा आभास तयार करणार.....अजून काय." अरुंधतीचे डोळे चमकले.

रंगीला रे...तेरे रंग में यूं रंगा है... मेरा मन...छलिया रे...पलकों के झुले से, सपनों की डोरी,प्यार ने बांधी जो, तुने वो तोडी

खेल ये कैसा रे, कैसा रे साथी, दिया तो झुमें है, रोये है बाती, कहीं भी जाये रे, रोये या गाये रे, चैन ना पाये रे

ती गुणगुणत होती.

-----------समाप्त----------

विनीता श्रीकांत देशपांडे

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. विनिता देशपांडे यांचे हे चवथे पुस्तक.**

विनिता देशपांडे यांच्यासारख्या ज्येष्ठ लेखिका आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), डॉ. वृषाली जोशी (८ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।